# डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

# कृषी विज्ञान केंद्र,

**वाघापूर रोड, यवतमाळ 445 001**

(An ISO 9001:2008 Certified Organisation)

E-Mail – pckvkytl@yahoo.co.in Website www.kvkyavatmal.pdkv.ac.in


---

जा.क्र /कृविके/यवत/४१६/२०२३

दिनांक: ०७ /११ /२०२३

**प्रति,**

**१. मा. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, यवतमाळ**

**२. मा. कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ**

**विषय :** कापूस पिकावरील लष्करी अळी/तंबाखूचे पाने खाणारी अळी (स्पोडोप्टेरा) चे व्यवस्थापन**.....**

**मा. महोदय ,**

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते कि कापूस पिकावरील लष्करी अळी/तंबाखूचे पाने खाणारी अळी (स्पोडोप्टेरा) चे व्यवस्थापन विषयक जनजागृती आपले स्तरावरून करावे. हि विनंती.

वरिष्ठ शात्रज्ञ तथा प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र,यवतमाळ-१,
(डॉ.पंदेकृवि,अकोला)

**कापूस पिकावरील लष्करी अळी/तंबाखूचे पाने खाणारी अळी (स्पोडोप्टेरा) चे व्यवस्थापन**

कापूस पिकावर लष्करी अळी (स्पोडोप्टेरा)चा प्रादुर्भाव आढळून येत असल्यास त्वरित कापूस पिकामध्ये मोठ्या संख्येने प्रौढ नर पतंग जेरबंद करण्यासाठी कामगंध सापळयांचा वापर करावा.

प्रती हेक्टरी ४ ते ५ प्रकाश सापळयांचा वापर करावा.

मुख्य शेत तणविरहीत ठेवणे तसेच आजुबाजूचे क्षेत्र स्वच्छ ठेवावे

किडीने आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास लगेच कापूस पिकावर मेटाऱ्हायझियम ॲनिसोप्लि किंवा बिव्हेरिया बेसीयाना १.१५ % डब्ल्यु पी हे बुरशीजन्य कीटकनाशक ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

कापूस पिकामध्ये लष्करी अळीचा प्रादुर्भाव टाळण्याच्या दृष्टीने त्यावर स्पिनेटोरम ११.७ % एस.सी. ०.८२ मिली किंवा क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५% एस.सी. ०.३ मिली किंवा Novaluron 08.80 % SC १ मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ % एसजी ०.४ ग्रॅम किंवा Chlorpyrifos 50 % + Cypermethrin 05 % EC २ ते ४ मिली यापैकी कोणत्याही एका किटकनाशकांची प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.



